**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail- pilcbnskr@gmail.com**

---

# प्रेसनोट

**दिनांक:- २२/०६/२०१८**

## गुणात्मक अन्वेषणासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांना मा.पोलीस महासंचालकांचे बक्षिस प्रदान

---

महाराष्ट्र राज्य पोलीस दलातर्फे **''गुणात्मक अन्वेषणसाठी सर्वोत्कृष्ठ प्रयत्न''** या सदराखाली मा.पोलीस महासंचालकांचे पुरस्कारासाठी निवड करण्यात येते. नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे आस्थापनेवरील स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी गतवर्षात पिंपळगाव येथील श्रीनिवास ज्वेलर्सचे दुकानात झालेल्या सोन्याचे दागिन्यांचे चोरीचे गुन्हयात उत्कृष्ट तपास करून केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल माहे डिसेंबर २०१७ मध्ये मा.पोलीस महासंचालक साो, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचा ''गुणात्मक अन्वेषणसाठी सर्वोत्कृष्ठ प्रयत्न'' पुरस्काराकरीता निवड करण्यात येवुन १० हजार रूपयांचे बक्षिस मंजुर केले आहे.

आज रोजी नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस गुन्हे परिषदे दरम्यान सदर गुन्हयात उत्कृष्ट कामगिरी करणारे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, सहा.पोलीस उपनिरीक्षक रविंद्र शिलावट, पोहवा बंडु ठाकरे, पोना दिलीप घुले** यांना नाशिक परिक्षेत्राचे **विशेष पोलीस महानिरीक्षक मा.डॉ.छेरिंग दोरजे** साो यांचे हस्ते प्रशस्तीपत्र देवुन गौरविण्यात आले. यावेळी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे साो,** अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. हर्ष पोद्दार साो,** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड साो** यांनी पुरस्कार प्राप्त अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करून भविष्यातही अशीच उल्लेखनीय कामगिरी करावी यासाठी शुभेच्छा दिल्या आहे. गुन्हे परिषदेत जिल्हयातील उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी उपस्थित होते.

नाशिक जिल्हयातील पिंपळगाव बसवंत शहरात दिनांक २१ सप्टेंबर २०१७ रोजी रात्रीचे सुमारास भरवस्तीतील सराफाच्या दुकानात धाडसी चोरी झाली होती, त्यामुळे पिंपळगावासह नाशिक जिल्हयात खळबळ उडाली होती. पिंपळगाव बसवंत येथील सराफा व्यावसायिक श्री. अशोक चोपडा यांचे मुंबई आग्रा रोड वरील ॲक्सिस बॅकेशेजारील **श्रीनिवास ज्वेलर्स दुकानामध्ये** अज्ञात आरोपीतांनी प्रवेश करून स्ट्राँगरूममधील तिजोरी उघडुन **२ कोटी ६४ लाख ४ हजार ७१० रू. किंमतीचे सोन्याचे दागिने** धाडसी चोरी करून चोरून नेले होते. सदर गुन्हा स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने २४ तासांचे आत उघडकीस आणुन **२ कोटी २१ लाख ६० हजार ५ रू.** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करून गुन्हयाचा सर्वोत्कृष्ट तपास केला व आरोपीतांविरूध्द मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास ''गुणात्मक अन्वेषणसाठी सर्वोत्कृष्ठ प्रयत्न'' या सदराखाली मा. पोलीस महासंचालकांचा पुरस्कार मिळाल्याने जिल्हाभरातुन कौतुकांचा वर्षाव होत आहे.